**Historicity Research Journal**
**Volume 2 | Issue 10 | June 2016**

**Impact Factor : 0.4521(UIF)**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *सुफी संत गिरडचे शेख फरीद बाबा*

*प्रा.राजू भाऊरावजी खरडे*

*आर.बी.व्यास. कला वाणिज्य महाविद्यालय कोंढाळी जि. नागपूर.*

**प्रस्तावना:**

मुस्लीम धर्मात झालेल्या सुफी संतात गिरडचे शेख फरीद ह्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. शेख फरीद यांचा जन्म वर्धा जिल्हयात झाला नसला तरी, एक तप त्यांचे वास्तव्य वर्धा जिल्हयातील गिरड येथे होते. त्यांच्या वास्तव्यामूळे गिरडला सुफी संप्रदायाचे पवित्र प्राप्त होऊन मोठया प्रमाणात मुस्लीम त्याच बरोबर हिंदु धर्माचे लोकही प्रचंड संख्येने दर्शन घेण्यासाठी जात असतात. गिरडला मोहरमचा उरुस दहा दिवस साजरा केला जातो. याच बरोबर रामनवमीचा उत्सव ही तितक्याच भक्तीभावाने साजरा केला जातो. हिंद-मुस्लीमांचे गिरड एक पवित्र ठिकाण आहे.

बाबा फरिद यांचे पूर्ण नाव शेख फरीदउद्दीन मसुद गंज असुन त्यांचा जन्म इ.स. ११७३ मध्ये पंजाब प्रांतातील, मुल्तान जिल्हयातील दाचावली मसाईक येथे झाला. बाबा फरीद यांच्या वडिलाचे नाव शेख जलालऊउद्दीन सुलेमान तर, आईचे नाव मरीयम होते. फरीद यांचा लहानपणापासुन आध्यात्माकडे ओढा असुन, लहान वयातच फरीद यांनी शेख कुतुबूद्दीन बखतियार यांचे शिष्यत्व पत्कारले. बाबा फरीदने कडक तपश्चर्या केली. बाबा फरीदचे अनेक शिष्य असून, त्यातील श्रेष्ठ शिष्य शेख निजामउद्दीन औलीया होय. बाबा फरीद अत्यंत लोकप्रिय संत असुन नेहमीच शिष्य व लोकांचा गराडा त्यांच्या अवती-भोवती असत. सुफी संप्रदायातील बाबा फरीद चिश्ती शाखेचे सर्वश्रेष्ठ संत होते. शेख फरीद यांनी १३० श्लोक लिहले, असुन त्यापैकी १८ श्लोकांचा समावेश ‘गुरुग्रंथ साहेबा’ या ग्रंथात शिख धर्मगुरुंनी केलेला आहे. गिरड हे गाव वर्धा जिल्हयातील समुद्रपुर तहसीलीतील असून, वर्धेपासून ५६.२ कि.मी तर हिंगणघाट पासुन ३२ कि. मी. अतंरावर असुन नागपुर वर्धा सिमेवर आहे. उत्तर भारतातील पंजाब प्रांतात जन्म झालेले बाबा फरीद ३० वर्ष सतत भटकत राहिल्यानंतर इ. स. १२४४ च्या सुमारास गिरडच्या टेकडीवर आले. आणि राहु लागले. याच ठिकाणी ते कडक तपश्चर्या करु लागले.

गिरड विषयी अनेक कथा सांगितल्या जातात. लोक कथेनुसार गिधोबा नावाचा दुष्ट राक्षस गिरडला राहत होता. त्याच्याच नावावरून ‘गिरड’ हे नाव पडले असावे. याच सुमारास बाबा फरीद गिरड येथे आले. गिधोबा हा राक्षस असल्यामुळे त्याला खाण्यासाठी माणसाचे मासं लागत असे. गिधोबाने शेख फरीदकडे खाण्याचा मागणी केली असता. शेख फरीदने खाण्यासाठी भाकर दिली, ती खाऊन गिधोबाची भुक शांत झाली व त्याने पिण्यासाठी पाणी मागितले असता, बाबा फरीदने काठी उचलुन टेकडीकडे दाखविली असता, तेथे पाण्याचे झरे निर्माण झाले. गिधोबा तेथील पाणी मन तुप्त होईपर्यंत प्याला. या झऱ्याचे रूपांतर तळयात झाले. हे तळे बाबा फरीदच्या चमत्काराने निर्माण झाले असे सांगितले जाते. या तळयात असणाऱ्या कासवाला स्थानिय जनता पवित्र मानतात. तळयातील पाणी पिऊन शांत न होता गिधोबाने बाबा फरीदला कुस्ती खेळण्याचे आव्हान दिले. सुरूवातीला बाबा फरीदने नकार दिला. परंतु बाबा फरीदने गिधोबाचे आव्हान स्विकारले. बाबा फरीदने दुष्ट राक्षस गिधोबाला टेकडीच्या पायथ्याशी इतक्या जोरात जमिनीवर आपटले की, गिधोबा जमीनीत पुरला गेला. त्याचा एक पाय फक्त वर राहीला. पायाची आकृती दगडी स्तंभाच्या रूपाने आजही दिसते. तो त्या राक्षसाचा पाय आहे. अशी लांकोची समजूत आहे. गिरड येथील ही टेकडी फरीद पहाड या नावने ओळखली जाते. गिरड टेकडीच्या परिसरात जायफळ, नारळ, सुपारी या आकाराचे दगड सापडतात. हाही बाबाचा चमत्कार आहे. असे मानल्या जाते. दुसऱ्या एका आख्यायिकेनुसार दोन बंजारा व्यापारी फळे व मसाले घेऊन बैलगाडीत जात

असताना, बाबा फरीदने त्यांना बैलगाडीत काय आहे असे विचारले असता, त्या व्यापाऱ्यांनी उपहासाने दगड-गोटे आहे असे सांगितले. तेव्हा बाबा फरीद शांतपणे म्हणाले, तुम्ही म्हणाल तसेच घडेल, असे म्हणताच त्या मालाचे दगड बनले. अचानक बैलगाडीतील पोत्यांचे दगडामुळे वजन वाढल्याने बैल खाली बसले. तेव्हा त्या व्यापाऱ्यांनी असे का झाले म्हणून पोती तपासली असता खरच त्यात दगड आढळले. तेव्हा व्यापारांना आपण खोटे बोलण्याचा पश्चाताप झाला. व ते व्यापारी बाबा फरीदला शरण आले. बाबा फरीदने संत महत्मांच्या वृत्तीप्रमाणे त्यांना माफ करुन त्यातील दगड-गोटे फेकुन देऊन पोत्यात झाडांची पाने भरा आणि पुढे जा असे सांगितले. तेव्हा ते व्यापारी बाबा फरीदच्या म्हण्यानुसार पाने भरूण पुढे निघाले असता काही अंतरावर गेल्यावर पुन्हा बैल बसले. तेव्हा व्यापारांनी पुन्हा पोती बघितली असता, पाला पाचोळयांचे रूपांतर सोने चांदित झाल्याचे दिसले. हे बघून त्या व्यापाऱ्यांना आनंद झाला. बाबा फरीदच्या चमत्कारामुळे हे सगळे घडले होते. हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी सोने-चांदी गावातील लोकांना वाटून दिले. व ते व्यापारी बाबा फरीदचे शिष्य बनले. बाबा फरीदचा चमत्कार बघून अनेक गावकरी ही बाबांचे शिष्य बनले. बाबांच्या चमत्कारामुळे झालेले दगड बाबांच्या म्हण्यानुसार फेकुन दिले होते. ते ठिसुळ असून गावकरी हे दगड गोळा करुन त्याची पावडर तयार करुन त्याचा उपयोग शारीरिक पिढया, दुःख दुर करण्यासाठी करतात.

गिरडची टेकडी आणि भूमी शेख फरीदच्या १२ वर्षाच्या वास्तव्याने पवित्र झाली. शेख फरीदचा जन्म मोहरमच्या पाचव्या दिवशी झाल्यामूळे गिरड येथे मोहरम उत्सव दहा दिवस मोठया उत्साहाने साजरा केल्या जातो. तलावाच्या काठावरच राम मंदिर आहे. रामनवमीच्या दिवशी तेथे मोठी यात्रा भरते. हिंदु व मुसलमान या दोन्ही उत्सवात मोठया संखेने सहभागी होतात. हिंदु-मुसलमान ऐक्याचे अनोखे रूप गिरड येथे आपल्याला बघायला मिळते. शेख फरीद बाबत आज ही गिरड परीसरातील लोकांमध्ये अपार श्रध्दा आहे. शेख फरीदचा मृत्यु १७ आक्टोबंर १२६५ रोजी वयाच्या ६२ व्या वर्षी झाला. आणि त्यांचे दफन पंजाब प्रातांतील अजोधन/पाकपाटन येथे करण्यात आले.

***संदर्भ ग्रंथः–***


१) वर्धा जिल्हा गॅझेटियर – संपादक डॉ. कि. का. चौधरी
२) पुर्व विदर्भातील ऐतिहासिक व प्रेक्षणिय स्थळे – ले. डॉ. नलिनी टेंभेकर
३) नागपुर भोल्यांची बखर – ले. या.मा. काळे
४) नागपुर भोसंल्याचा इतिहास – ले. या. मा. काळे
५) भोसले कालीन नागपुर – ले. डॉ.भा.रा. अंधारे
६) Midieval India Culture – A.L. Shrivatava